5. **राष्ट्रीय गुरे पैदास प्रकल्प (एनपीबीबी) आणि राष्ट्रीय गोकुळग्राम मिशन (आरजीएम)** :

राष्ट्रिय गुरे पैदास कार्यक्रमाकरिता मार्च-2017 पर्यंतच्या कालावधीसाठी रु.52.41 कोटी निधी मंजूर. राष्ट्रीय गोकुळ मिशन हा नॅशनल प्रोग्राम ऑफ बोव्हाईन ब्रिडींग ॲन्ड डेअरी डेव्हलपमेंट या कार्यक्रमाचाच एक भाग आहे. सदर योजनेमध्ये आजपावेतो एकुण रु. 1600.00 लक्ष निधी प्राप्त झालेला आहे.

सदर योजनेमध्ये खिल्लार, देवणी, डांगी, गवळावू, साहिवाल व नागपुरी या जातीच्या प्रत्येकी 1000 या प्रमाणे एकुण 6000 उच्चवंशावळीच्या गायी/म्हशींची निवडुन त्यांना कृत्रिम रेतन व अनुषंगिक सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत व त्यामार्फत देशी उच्चवंशावळीच्या 1000 वळूंची निर्मिती करण्याकरीता फिल्ड परफॉर्मंस रेकॉर्ड हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

या योजनेमध्ये एकुण 300 मैत्री (MAITRI-Multi purpose Artificial Insemination Technicians in Rural India) ची निवड करुन त्यापैकी 176 मैत्रींना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. निवड करण्यात येणाऱ्या सर्व 300 मैत्रींना कृत्रिम रेतन व ईतर अनुषंगीक कामातुन रोजगाराची निर्मीती करण्याचा उद्देश आहे.

तसेच, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळा अंतर्गत पुणे, नागपुर व औरंगाबाद येथे कार्यरत गोठित रेत प्रयोगशाळेसाठी उच्च वंशावळीच्या देशी वळूंची खरेदी करण्यात येणार असुन उच्च प्रतिच्या विर्यमात्रांचे उत्पादन करण्यात येणार आहे. आजपावेतो हरियाणा-5, गीर-3, साहिवाल-2, पंढरपुरी-6 व मुऱ्हा-7 अशा एकुण 23 देशी वळूंची खरेदी करण्यात आलेली आहे.

सदरील योजनेअंतर्गत वळू माता प्रक्षेत्र, ताथवडे, पोहरा येथे गोकुळ ग्रामचे बळकटीकरण व दापचेरी येथे गोकुळ ग्रामची स्थापना करुन प्रत्येक प्रक्षेत्रावर 600 उच्च वंशावळीच्या व 400 भाकड गायींचे संगोपन करणे अपेक्षित आहे. वळू माता प्रक्षेत्र, ताथवडे व पोहरा येथे अनुक्रमे 600 उच्च वंशावळीच्या पंढरपुरी म्हशी व गवळावु गायी खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु आहे. दापचेरी येथे गीर गायी खेरदी करणे, शासन निर्णयाच्या अनुषंगाने वर्ग झालेली जमीन महसुल विभागाकडुन मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नावे करणेसाठी पाठपुरावा करणे, शेतीविषयक किरकोळ अवजारे खरेदी करणे, पशुधन व शेतीविषयक कामे करण्यासाठी मनुष्यबळाच्या सेवा कंत्राटी पद्धतीने घेण्याकरीता प्रक्रिया राबविणे, इत्यादी कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

वळू माता प्रक्षेत्र, ताथवडे येथे उच्च वशांवळीच्या पंढरपुरी म्हशी खरेदी करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असुन आजपावेतो एकुण 95 पंढरपुरी म्हशी खरेदी करुन त्यांचे संगोपन करण्यात येत आहे व दिनांक 31.03.2018 अखेर एकुण 125 उच्च वशांवळीच्या पंढरपुरी म्हशी खरेदी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच, वळू माता प्रक्षेत्र, पोहरा येथे प्राथमिक स्तरावर 40 गवळावू गायींसाठी नवीन शेडचे बांधकाम करण्यात आलेले असुन उच्चवंशावळीच्या 34 गवळावू गायी खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

तिनही प्रक्षेत्रांवर प्रत्येकी 600 उच्च वंशावळीच्या गायीं/म्हशींचे संगोपन करण्याकरीता कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडुन कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील अंदाजपत्रकानुसार प्रत्येक प्रक्षेत्रावर 150 जनावरांकरीता 100 मिटर बाय 35 मिटर (3500 वर्ग मिटर) प्रमाणे एक शेड अशी एकुण ४ शेड बांधण्यात येणार आहेत. तसेच, ३५०० वर्ग मिटरच्या एका शेडकरीता अंदाजपत्रकाप्रमाणे एकुण रु. ७२,०१,६३६/- खर्च लागणार आहे व त्यानुसार ६०० गायी/म्हशींकरीता ४ शेडच्या बांधकामाकरीता एकुण रु. २,८८,०६,५४७/- खर्च अपेक्षित आहे. शेड बांधकामाचा आराखडा केंद्र शासनाने मान्य केला असुन शेड बांधकामाच्या अंदाजपत्रकानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असुन शेडची बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

| Year of Start : 2014-15 | | Rs.Lakh | | | Physical Achievment | | | Remarks (Aug-2018) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No** | **Project Component** | **Grant Received** | **Expdt** | **Balance** | **Target** | **Ach** | **Balance** | |
| 1 | Procurement of AI Bulls for Semen Stations | **100.50** | 12.75 | **87.75** | 134 | 17 | 117 | Hariana (PS)-5, Gir (PS)-3, Murrha (PT)-7,Sahiwal(PS)-2 bulls procured for FSL. |
| 2 | Conversion of Stationary AI centres into mobile | **99.00** | 99.00 | **0.00** | 660 | 660 | 0 | AI & allied instruments are supplied. |
| 3 | Refresher training of existing AI workers | **5.00** | 2.76 | **2.24** | 167 | 92 | 75 | Training of 92 Govt.AIT's is completed at BAIF, Pune |
| 4 | Managerial Grants | **40.00** | 37.75 | **2.25** | 0 | 0 | 0 | Office expenditure, remuneration to QCO appointed at 3 FS Labs. |
| 5 | Training of New MAITRI workers | **36.00** | 5.28 | **30.72** | 300 | 176 | 124 | Total 176 AH diploma holders trained at BAIF, Pune. |
| 6 | Supply of Equipment to MAITRI workers | **90.00** | 0.00 | **90.00** | 300 | 0 | 300 | Equipments will be supplied after the appointment of MAITRI workers. |
| 7 | Field Performance Recording *& bull production* | **178.20** | 0.00 | **178.20** | 8910 | 0 | 8910 | FPR programme will be started after the appointment of MAITRI workers. |
| 8 | Buffalo Bull Production Programme | **69.00** | 0.00 | **69.00** | 200 | 0 | 200 | |
| 9 | Indigenous Cow Bull Production Programme | **103.50** | 0.00 | **103.50** | 300 | 0 | 300 | |
| 10 | Strengthening of BMF/BRC/Est. of Gokul Gram | **830.00** | 830.00 | **0.00** | 3 | 2 | 1 | Expdt.of Tathwade-Rs.136.00 Lakh & Pohara-Rs.94.11 Lakh Expdt booked for shed con.at Tathwade-Rs.227.34 Lakh & at Pohara Rs.147.34 Lakh |
| 11 | Registration of Bulls used for N.S. | **5.00** | 0.00 | **5.00** | 500 | 0 | 500 | Both components are deleted in the revised outlay. But the funds for these components are released by GoI before the revised outlay. Need to be reappropriate in other activities. |
| 12 | Reward to Best Bull keeper | **7.00** | 0.00 | **7.00** | 28 | 0 | 28 | |
| 13 | Est. of Breeders Associations | **25.00** | 5.00 | **20.00** | 5 | 1 | 4 | Lalkandhari Breeders Association established. |
| 14 | Rewards to Farmers and Breeders Associations | **5.00** | 0.00 | **5.00** | 0 | 0 | 0 | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 | Trainers Training Programme and Training of Professionals | **6.80** | 0.30 | **6.50** | 17 | 0 | 17 | Expdt. On ToT to LDOs at Anand Gujrat |
| | **Total (A)** | **1600.00** | **992.84** | **607.16** | | | | **UC of Rs. 988.44 Lakh has been submitted to GoI** |